आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र– दुपारी १.३० वाजता

२६ नोव्हेंबर २०२२ – शनिवार

**ठळक बातम्या**

- संविधानाच्या उद्देशिकेतील 'आम्ही लोक' म्हणजेच वचनबद्धता, प्रतिज्ञा आणि विश्वास, ज्यामुळे भारत देश लोकशाहीची जननी ठरला आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं संविधान दिनानिमित्त आय़ोजित कार्यक्रमात प्रतिपादन

- २६/११ हल्ल्यातल्या शहिदांना आणि मृत झालेल्यांना राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह देशभरातून श्रद्धांजली / देशभरात विविध कार्यक्रमांच आयोजन

- वर्ष २०१९, २०20 आणि २०२१ या वर्षांसाठी संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची संगीत नाटक अकादमी क़डून घोषणा

- **आणि**
- PSLV C-५४ अंतराळयानाचं श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून यशस्वी प्रक्षेपण

**<><><><><>**

संविधानाच्या उद्देशिकेतील 'आम्ही लोक' म्हणजेच वचनबद्धता, प्रतिज्ञा आणि विश्वास, ज्यामुळे भारत देश लोकशाहीची जननी ठरला आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे, ते आज संविधान दिनानिमित्त नवी दिल्ली इथं सर्वोच्च न्यायालयात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. भारतीय राज्यघटना खुली, भविष्यवादी आणि पुरोगामी विचारांसाठी प्रसिध्द आहे. तिचा आत्मा युवाकेंद्रित असल्याचं ते म्हणाले. राज्यघटना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी तरुणांनी चर्चा आणि वादविवादांमध्ये सहभागी होण्याचं आवाहन मोदी यांनी केलं.

देशातील सर्वांसाठी न्याय सुलभता सुनिश्चित करण्यासाठी न्यायपालिका ई-इनिशिएटिव्हसह अनेक पावलं उचलत असल्याचे मोदी यांनी अधोरेखित केलं.

मोदी पुढे म्हणाले की, आजच्या जागतिक परिस्थितीत संपूर्ण जगाच्या नजरा भारतावर आहेत आणि वेगाने होत असलेल्या विकासादरम्यान देशाची जागतिक प्रतिमा मजबूत होत आहे. ते असंही म्हणाले, की भारत एका आठवड्याच्या कालावधीत G२० चं अध्यक्षपद स्वीकारेल आणि लोकशाहीची जननी म्हणून देशाची प्रतिमा मजबूत होईल याची खात्री करणं आवश्यक आहे असं ते म्हणाले. या प्रसंगी त्यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी ई-कोर्ट प्रकल्पांतर्गत विविध नवीन उपक्रमांचं उद्घाटन केलं. हा प्रकल्प याचिकाकर्ते, वकील आणि न्यायपालिका यांना माहिती आणि तंत्रज्ञानाद्वारे सेवा प्रदान करण्याचा प्रयत्न आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नागरिकांना आवाहन केलं  आहे की, सर्वांनी भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या मूल्यांचं  संवर्धन करण्याची प्रतिज्ञा घ्यावी आणि आपल्या पूर्वजांच्या कल्पनेतल्या  देशाच्या उभारणीसाठी प्रयत्न करावेत. संविधान दिनानिमित्त धनखड यांनी बोलताना , संविधान हे केवळ वकिलाचं दस्तऐवज नाही, ते जीवन जगण्याचं   वाहन आहे आणि तिचा आत्मा हा नेहमीच चिरंजीवी आहे. असे म्हणत  डॉ.आंबेडकरांच्या  वक्तव्याचा दाखला दिला.

<><><><><>

मुंबईतल्या  २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांचं देश कृतज्ञतेनं स्मरण करत आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आपलं कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सुरक्षा रक्षकांना देश आदरांजली वाहत आहे, असं त्यांनी म्हटलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनीही २६/११ च्या

हल्ल्यात जीव गमावलेल्यांना आदरांजली वाहिली आहे. देशाला २६/११ च्या हल्ल्याचं विस्मरण झालेलं नाही, आणि ते कधीही विस्मृतीत जाणार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात शहीद झालेले पोलीस, सुरक्षा दलाचे अधिकारी आणि नागरिकांना माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनी आदरांजली वाहिली आहे. राष्ट्र नेहमीच या शूरवीरांच्या त्याग आणि बलिदानाचं स्मरण करेल, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

दहशतवादामुळे मानवतेला धोका असल्याचं मत परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज व्यक्त केलं आहे . मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचं स्मरण करून डॉ. जयशंकर म्हणाले की, भारतासह संपूर्ण जग आज २६/११ च्या पीडितचं स्मरण करत आहे. भारत नेहमीच जागतिक शांतता आणि सामाजिक सौहार्दाचा आश्रयदाता राहिला आहे, परंतु दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी हा देश कटिबद्ध आहे असं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले.

<><><><><>

देशाची आर्थिक राजधानी आणि देशाच्या सार्वभौमत्वावर झालेला २६/११ चा हल्ला हा कधीही भरून न येणारा घाव आहे; मात्र असं दुःसाहस करणाऱ्यांना सर्वशक्तीनिशी नेस्तनाबूत केलं जाईल हे देशानं कृतीतून दाखवून दिलं आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत हॉटेल ताजमहल पॅलेस इथं आयोजित '२६/११ मुंबई संकल्प' या कार्यक्रमात ते काल बोलत होते.

<><><><><>

देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला हादरवून टाकणाऱ्या मुंबईवरच्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याला आज १४ वर्ष पूर्ण होत आहेत. या हल्ल्यात जीवाची पर्वा न करता दहशतवाद्यांना सामोरे गेलेले आणि प्राण गमावलेले पोलीस, सुरक्षा रक्षक आणि

निरपराध नागरिकांना आदरांजली वाहण्यासाठी आज विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहिद पोलिसांच्या स्मारकाला भेट देऊन पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

<><><><><>

आज अंदमान आणि निकोबार बेटांवर जी-२० देशांच्या मिशन प्रमुखांची संवादात्मक चर्चा होणार आहे.त्यापूर्वी , जी-२० शिष्टमंडळाचे काल पोर्ट ब्लेअर इथं आगमन झालं . त्यांच्या आगमनानंतर लगेचच शिष्टमंडळानं नॅशनल मेमोरियल सेल्युलर जेलला भेट दिली.

<><><><><>

पुण्याच्या विकासाला केंद्र सरकारचं प्राधान्य राहील अशी ग्वाही केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली. काल पुण्यातल्या लोहगांव विमानतळावर उभारलेल्या एरोमॉल मल्टीलेवल कार पार्किंगचं उद्घाटन काल शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कला,संस्कृतीचं माहेरघर असलेल्या पुण्यात व्यापार,उद्योग,माहिती तंत्रज्ञान आदी क्षेत्रही विकसित झाली आहेत त्यामुळे केंद्र सरकारनं पुण्याला प्राधान्य दिलं आहे. लोहगाव विमानतळावर नवीन टर्मिनल इमारतीचं काम सत्तर टक्के पूर्ण झालं असल्याचं ते म्हणाले. यावेळी उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार गिरीश बापट, आदी मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

संगीत नाटक अकादमीनं २०१९,२०२० आणि २०२१ या वर्षांसाठी संगीत नाटक अकादमी पुरस्कारांची काल घोषणा केली. या पुरस्कारासाठी १२८ कलाकारांची निवड करण्यात आली आहे. तर कला क्षेत्रातील दहा नामवंत व्यक्तींची

अकादमी सहध्यायी म्हणून निवड करण्यात आली आहे. अकादमी सहाध्यायींच्या पुरस्काराचं स्वरूप ३ लाख रुपये आहे; तर ताम्रपत्र,शाल आणि १ लाख रुपये असं अकादमी पुरस्काराचं स्वरूप आहे. हे पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते एका विशेष समारंभात प्रदान केले जातील. राज्यातील विविध नामवंत कलाकारांचा यात समावेश आहे. प्रसिद्ध शास्त्रीय गायिका मालिनी राजूरकर, आरती अंकलीकर टिकेकर, कथ्थक नृत्य गुरु डॉ. नंदकिशोर कपोते, शमा भाटे, प्रसिद्ध अभिनेता प्रशांत दामले, दिग्दर्शक कुमार सोहोनी, कठपुतली कला प्रकारात पारंगत असलेल्या मीना नाईक यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

<><><><>

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आज श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून PSLV C-५४ या अंतराळ यानाचं यशस्वी प्रक्षेपण केलं. या अंतराळ यानाच्या पेलोडमध्ये एक महासागर निरीक्षण उपग्रह आणि आठ सूक्ष्म उपग्रह असून ते दोन तासांच्या निर्धारित वेळेत सूर्याच्या कक्षेत स्थापित केले जाणार आहेत. अंतराळ यानाच्या ११७ किलो वजनी पेलोडमध्ये ओशन मॉनिटर, सी सरफेस मॉनिटर, के.यू. बँड, स्कॅबट्रोमीटर आणि फ्रान्सचा पेलोड अर्गोस यांचा समावेश आहे. या अर्गोसच्या मदतीनं पॅरिस करारानुसार आधीच अंतराळ कक्षेत असलेल्या इंडो-फ्रेंच हवामानविषयक उपग्रहांची संख्या आणि कार्यक्षमता वाढवली जाईल.

<><><><>

केरळमध्ये, कन्नूर जिल्ह्यातल्या एझिमाला इथल्या भारतीय नौदल अकादमीमधून उत्तीर्ण झालेल्या २५८ मिडशिपमन आणि कॅडेट्सचा शानदार दीक्षांत समारंभ आज झाला. या विद्यार्थ्यांनी नेव्हल ओरिएंटेशन अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. यामध्ये बांगलादेश, मादागास्कर, मॉरिशस, म्यानमार, सेशेल्स, श्रीलंका आणि

टांझानिया यांसारख्या भारताशी नौदल स्तरावर मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या १६ कॅडेटसनं देखील हे प्रशिक्षण पूर्ण केलं आहे.

//<><><><>//